Shri Shivaji Education Society, Amravati's

# SHRI PUNDLIK MAHARAJ MAHAVIDYALAYA, NANDURA (RLY)

## UNNAT BHARAT ABHIYAN (UBA)

# पथनाट्याद्वारे जागतिक ओझोन दिन साजरा

## श्री पुंडलिक महाराज महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

नांदुरा, ता. १७ : श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालीत, श्री पुंडलिक महाराज महाविद्यालये येथे प्राचार्य डॉ. दिलीप हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार (ता.१६) रोजी रसायनशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना पथक यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ओझोन दिनाच्या निमित्ताने पथनाट्य सादर करून जनजागृती करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा. डॉ. अल्का मानकर, रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. स्मिता तराळे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. शांताराम भोये, प्रा. डॉ. महेश मुळूक, प्रा. अमोल निपटे, प्रा. मुनिल चव्हाण, प्रा. निलकेश धुर्वे, एकनाथ अवचार उपस्थित होते. प्रा.डॉ. स्मिता तराळे यांनी विद्यार्थ्यांना वातावरणाच्या विविध स्तरांची माहिती दिली व या स्तरांमध्ये ओझोनचे असलेले अनन्य साधारण महत्त्व, पृथ्वी आणि सजीवसृष्टीकरिता किती महत्वाचे आहे. तसेच १६ सप्टेंबर १९८७ मधील मॉन्ट्रियल प्रोटोकॉल, सूर्यापासून निघणाऱ्या अतिनील किरणांचे धोके, सीएफसीमुळे ओझोनच्या अणूंचा होणारा विनाश आणि १६ सप्टेंबर १९९५ रोजी सर्वप्रथम जागतिक ओझोन दिन साजरा करण्यात आला व आता हा कार्यक्रम पर्यावरणपूरक जागरूकतापर म्हणून दरवर्षी १६ सप्टेंबरला घेण्यात येतो, या संदर्भात सविस्तर माहिती दिली. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. शांताराम भोये यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना रासायनिक घटकांमुळे पर्यावरणात जें बदल होतात. ओझोनचा विनाश टाळण्याकरिता अन्न, वस्त्र व निवारा या व्यतिरिक्त अतिरिक्त चैनीच्या वस्तूंचा वापर टाळणे इत्यादींवर माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ.अल्का मानकर यांनी पर्यावरणाच्या असंतुलनामुळे पृथ्वीचे अस्तित्व धोक्यात येत आहे. भविष्यात पृथ्वीवरील अनिष्ठ प्रकोप टाळण्यासाठी पर्यावरणाचा समोतल साधण्यासाठी मानवीसृष्टीने अत्यंत जबाबदारीने पाऊले टाकण्याची आज गरज असून, पर्यावरणाचे संतुलन राखणे हे केवळ पर्यावरण प्रेमींचीच जबाबदारी नाही तर सर्वांचीच आहे असे प्रतिपादन केले.

महाविद्यालयाच्या परिसरात बी.एससी. भाग-१ च्या विद्यार्थ्यांनी प्रसन्न, अवैस, रोशन, पल्लवी, गायत्री, साक्षी, कोमल, ममता, मनीषा, स्नेहा, वैष्णवी यांनी पथनाट्य सादर करून जागतिक ओझोन दिनाचे महत्त्व समजावून जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. निलकेश धुर्वे यांनी तर संचालन प्रा. अमोल निपटे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. सुनिल चव्हाण यांनी केले.



नांदुरा : कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग.

# श्री.पुंडलिक महाराज महाविद्यालयाचा उपक्रम



नांदुरा ; श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित, श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा रेल्वे, जि. बुलडाणा येथे प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने उन्नत भारत अभियानांतर्गत रसूलपूर, वडाळी, माळेगाव गोंड, पिंपळखुटा धांडे व लोणवाडी या पाच गावांचे घरगुती सर्वेक्षण व उपक्रम पूर्ण केले.उन्नत भारत अभियान हा मनुष्यबळ विकास मंत्रालयाचा (एचआरडी) एक प्रमुख कार्यक्रम आहे. उन्नत भारत अभियान हे सर्वसमावेशक भारताची संरचना तयार करण्यात मदत करण्यासाठी ज्ञान संस्थांचा लाभ घेऊन ग्रामीण विकास प्रक्रियेतील परिवर्तनात्मक बदलाच्या दृष्टीकोनातून प्रेरित आहे. उन्नत भारत अभियानाचे उद्दिष्ट उच्च शिक्षण संस्थांना ग्रामीण भारतातील लोकांसोबत विकासाची आव्हाने ओळखण्यासाठी आणि शाश्वत विकासाला गती देण्यासाठी योग्य उपाय विकसित करण्यासाठी सक्षम बनवणे आहे. उदयोन्मुख व्यवसायांसाठी ज्ञान आणि पद्धती प्रदान करून आणि ग्रामीण भारताच्या विकासाच्या गरजांना प्रतिसाद देण्यासाठी सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रांच्या क्षमतांमध्ये सुधारणा करून समाज आणि सर्वसमावेशक शिक्षण प्रणाली यांच्यात एक योग्य वर्तुळ निर्माण करणे हे देखील त्याचे उद्दिष्ट आहे.या अभियानांतर्गत गावांमध्ये प्रभातफेरी, पथनाट्य, स्वच्छता मोहीम, ग्रामसभा, रोजगारविषयक मार्गदर्शन, शेतीविषयक मार्गदर्शन, मेरी माटी, मेरा देश, आदी कार्यक्रम घेऊन जनजागृती करण्यात आली. या संपूर्ण अभियानाचे नियोजन उन्नत भारत समन्वयक प्रा. शांताराम भोये, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनंदा डेकाटे यांनी केले होते. अभियानाच्या यशस्वीते साठी प्रा. डॉ. अलका मानकर, प्रा. स्मिता तराळे, प्रा. अमोल निपटे, प्रा. सचिन जाधव, प्रा. विनोद पवार, श्री. एकनाथ अवचार, आदी प्राध्यापक वर्ग व रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी दत्ता राजगुरू, कु. कल्याणी शेळके, कु. खुशी तायडे, पल्लवी जवरे आदी. रासेयो च्या स्वयंसेवकांनी उन्नत भारत अभियान सर्वेक्षण मध्ये सहभाग घेऊन सहकार्य केले,

# उन्नत भारत अभियानांतर्गत पाच गावांचे घरगुती सर्वेक्षण पूर्ण

## श्री पुंडलिक महाराज महाविद्यालयाचा उपक्रम

■ मलकापूर माझा ■

नांदुरा (प्रतिनिधी)- श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारा संचालित श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा येथे प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने उन्नत भारत अभियानांतर्गत रसूलपूर, वडाळी, माळेगाव गोंड, पिंपळखुटा धांडे व लोणवाडी या पाच गावांचे घरगुती सर्वेक्षण व उपक्रम पूर्ण केले.

उन्नत भारत अभियान हा मनुष्यबळ विकास मंत्रालयाचा (एचआरडी) एक प्रमुख कार्यक्रम आहे. उन्नत भारत अभियान हे सर्वसमावेशक भारताची संरचना तयार करण्यात मदत करण्यासाठी ज्ञान संस्थांचा लाभ घेऊन ग्रामीण विकास प्रक्रियेतील परिवर्तनात्मक बदलाच्या दृष्टीकोनातून प्रेरित आहे. उन्नत भारत अभियानाचे उद्दिष्ट उच्च शिक्षण संस्थांना ग्रामीण भारतातील लोकांसोबत




विकासाची आव्हाने ओळखण्यासाठी आणि शाश्वत विकासाला गती देण्यासाठी योग्य उपाय विकसित करण्यासाठी सक्षम बनवणे आहे. उदयोन्मुख व्यवसायांसाठी ज्ञान आणि पद्धती प्रदान करून आणि ग्रामीण भारताच्या विकासाच्या गरजांना प्रतिसाद देण्यासाठी सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रांच्या क्षमतांमध्ये सुधारणा करून समाज आणि सर्वसमावेशक शिक्षण प्रणाली यांच्यात एक योग्य वर्तुळ निर्माण करणे हे देखील त्याचे उद्दिष्ट आहे.

या अभियानांतर्गत गावांमध्ये प्रभातफेरी, पथनाट्य, स्वच्छता मोहीम, ग्रामसभा, रोजगार विषयक [illegible]

मेरी माटी.. मेरा देश आदी कार्यक्रम घेऊन जनजागृती करण्यात आली. या संपूर्ण अभियानाचे नियोजन उन्नत भारत समन्वयक प्रा.शांताराम भोये, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनंदा डेकाटे यांनी केले होते. अभियानाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.अल्का मानकर, प्रा.स्मिता तराळे, प्रा.अमोल निपटे, प्रा.सचिन जाधव, प्रा.विनोद पवार, एकनाथ अवचार आदी प्राध्यापक वर्ग व रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी दत्ता राजगुरू, कु.कल्याणी शेळके, कु.खुशी तायडे, पल्लवी जवरे आदी. रासेयोच्या स्वयंसेवकांनी उन्नत भारत अभियान सर्वेक्षण मध्ये सहभाग घेऊन सहकार्य केले.

# उन्नत भारत अभियानांतर्गत पाच गावांचे घरगुती सर्वेक्षण पूर्ण

**नांदुरा (प्रतिनिधी)-** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित, श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा रेल्वे, जि. बुलडाणा येथे प्राचार्य डॉ. दिलीप हांडे यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने उन्नत भारत अभियानांतर्गत रसूलपूर, वडाळी, माळेगाव गोंड, पिंपळखुटा धांडे व लोणवाडी या पाच गावांचे घरगुती सर्वेक्षण व उपक्रम पूर्ण केले.

उन्नत भारत अभियान हा मनुष्यबळ विकास मंत्रालयाचा (एचआरडी) एक प्रमुख कार्यक्रम आहे. उन्नत भारत अभियान हे सर्वसमावेशक भारताची संरचना तयार करण्यात मदत करण्यासाठी ज्ञान संस्थांचा लाभ घेऊन ग्रामीण विकास प्रक्रियेतील परिवर्तनात्मक बादलाच्या दृष्टीकोनातून प्रेरित आहे. उन्नत भारत अभियानाचे उद्दिष्ट उच्च शिक्षण संस्थांना ग्रामीण




भारतातील लोकांसोबत विकासाची आव्हाने ओळखण्यासाठी आणि शाश्वत विकासाला गती देण्यासाठी योग्य उपाय विकसित करण्यासाठी सक्षम बनवणे आहे. उदयोन्मुख व्यवसायांसाठी ज्ञान आणि पद्धती प्रदान करून आणि ग्रामीण भारताच्या विकासाच्या गरजांना प्रतिसाद देण्यासाठी सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रांच्या क्षमतांमध्ये सुधारणा करून समाज आणि सर्वसमावेशक शिक्षण प्रणाली यांच्यात एक योग्य वर्तुळ निर्माण करणे हे देखील त्याचे उद्दिष्ट आहे.

या अभियानांतर्गत गावांमध्ये प्रभातफेरी, पथनाट्य, स्वच्छता मोहीम, ग्रामसभा, रोजगारविषयक मार्गदर्शन, शेतीविषयक मार्गदर्शन, मेरी माटी, मेरा देश, आदी कार्यक्रम घेऊन जनजागृती करण्यात आली. या संपूर्ण अभियानाचे नियोजन उन्नत भारत समन्वयक प्रा. शांताराम भोये, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनंदा डेकाटे यांनी केले होते.सहभाग घेऊन सहकार्य केले.

S.P.M. College, Nandura (Rly.) SEAL

Shantaram Bhoye
Co-Ordinator
Unnat Bharat Abhiyan
Shri Pundlik Maharaj Mahavidyalaya,
Nandura (Rly.) Dist. Buldana.